दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष–४

अंक–१०

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ३३ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमीपूजन, उद्घाटन संपन्न

## विकासकामांमुळे मुंबई आणि ठाण्याची ओळख होणार आधुनिक

**ठाणे :** महायुती सरकारने मुंबई–एमएमआरमध्ये ३३ हजार कोटींहून अधिकचे प्रकल्प सुरू केले आहेत. आज १२ हजार कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रोची पायाभरणीही झाली आहे. नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र, नैना प्रकल्प, छेडानगर ते आनंदनगर असा उन्नत ईस्टर्न फ्री–वे, ठाणे महापालिकेचे नवीन मुख्यालय, अशा अनेक मोठ्या विकासकामांची पायाभरणीही आज करण्यात आली. या विकासकामांमुळे मुंबई आणि ठाण्याची आधुनिक ओळख होणार आहे, असे प्रतिपादन पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी केले.






पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते ५ ऑक्टोबर २०२४ रोजी वालावलकर सभा मैदान, बोरीवडे गाव, कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे (प.) येथे ३३ हजार कोटी रुपयांच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांचे ऑनलाईन भूमीपूजन व उद्घाटन तसेच ‘‘मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण’’ या योजनेच्या महिला लाभार्थ्यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार सोहळा संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील पहिली भूमिगत मेट्रो – कुलाबा–वांद्रे–सीप्झ : मुंबई मेट्रो मार्गिका – ३ टप्पा–१ (आरे जेव्हीएलआर ते वांद्रे–कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानक) शुभारंभ, ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमीपूजन, पूर्व मुक्त मार्ग विस्तार छेडा नगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे प्रकल्पाचे भूमीपूजन, नैना नगर रचना परियोजनांतर्गत विविध पायाभूत सुविधा कामांचे भूमीपूजन, ठाणे महानगरपालिकेच्या नूतन इमारतीचे भूमीपूजन, ‘‘मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण’’ योजनेच्या लाभार्थ्यांचा प्रातिनिधीक सत्कार, असे विविध कार्यक्रम संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजानिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, महिला व बालविकास मंत्री कु.अदिती तटकरे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, खासदार सुरेश म्हात्रे, सिडको महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाठ, विधानपरिषद सदस्य आमदार निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य सर्वश्री आमदार गणेश नाईक, संजय केळकर, प्रताप सरनाईक, किसन कथोरे, डॉ.बालाजी किणीकर, शांताराम मोरे, महेश चौघुले, कुमार आयलानी, विश्वनाथ भोईर, तसेच आमदार श्रीमती मंदा म्हात्रे, गीता जैन आदि मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागीय आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, ठाणे जिल्ह्यातील विविध महानगरपालिकांचे आयुक्त, वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, आज एक मोठी आनंदाची बातमी घेवून महाराष्ट्रात आलो आहे. केंद्र सरकारने आपल्या मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. ज्या परंपरेने देशाला ज्ञान, तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि साहित्याची समृद्ध संस्कृती दिली आहे त्याचा हा सन्मान आहे. त्याबद्दल मी देशातील आणि जगातील सर्व मराठी भाषिकांचे अभिनंदन करतो.

ते म्हणाले की, आज मुंबई महानगरात सुमारे ३०० किलोमीटरचे मेट्रोचे जाळे तयार होत आहे. आज मरीन ड्राइव्ह ते वांद्रे हा प्रवास कोस्टल रोडने १२ मिनिटांत पूर्ण होत आहे. अटल सेतूने दक्षिण मुंबई ते नवी मुंबई हे अंतरही कमी केले आहे. ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह भूमिगत बोगद्याच्या प्रकल्पाला गती मिळाली आहे. असे अनेक प्रकल्प आहेत. वर्सोवा ते वांद्रे सागरी सेतू प्रकल्प, ईस्टर्न फ्रीवे, ठाणे–बोरिवली बोगदा, ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प अशा प्रकल्पांमुळे या शहरांचा चेहरामोहरा बदलत आहे. मुंबईकरांना याचा मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे मुंबई आणि आसपासच्या शहरातील समस्या कमी होतील. येथे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, येथे उद्योगधंदे वाढतील.

महामार्ग, द्रुतगती मार्ग, रस्ते आणि विमानतळांच्या विकासातही आम्ही विक्रम केला आहे आणि २५ कोटी गरीब लोकांना गरिबीतून बाहेर काढले आहे, असे सांगून आता देशाला खूप पुढे न्यायचे आहे. सर्व मिळून महाराष्ट्राची स्वप्ने पूर्ण करू, या शब्दात सर्व विकास प्रकल्प आणि विकासकामांच्या पूर्णत्वासाठी उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांनी पैठणी शाल, महाराष्ट्राची ओळख असलेला पैठणी फेटा तसेच ठाण्यातील श्री कोपिनेश्वर मंदिरातील शिवलिंगाची प्रतिकृती व ठाण्याच्या दुर्गेश्वरी मातेची प्रतिमा देवून स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुप्रसिद्ध निवेदिका मानसी सोनटक्के यांनी केले.

## या प्रकल्पांचे झाले भूमीपूजन व उद्घाटन

**महाराष्ट्रासाठी ₹३३,००० कोटींच्या वेगवान विकासाची भेट**

- सुमारे १२ लाख प्रवाशांची रोज वाहतूक.
- आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स १२.६९ किमी
- एकूण १० स्थानके (७ भूमिगत १ जमीन स्तरावरील स्थानक)

**महाराष्ट्रातील पहिली भूमिगत मेट्रो**

- **कुलाबा-वांद्रे-सीप्झ** : मुंबई मेट्रो मार्गिका - ३ टप्पा-१ (आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानक) शुभारंभ.

**मुंबई प्रवासात... वेळ आणि इंधन कपात**

- पूर्व मुक्त मार्ग विस्तार छेडा नगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे प्रकल्पाचे भूमिपूजन
- दक्षिण मुंबई-ठाणे प्रवास वेगवान होणार
- ठाणे, नवी मुंबई आणि पूर्व उपनगराला दक्षिण मुंबईशी जोडणारा उन्नत मार्ग
- छेडा नगर ते आनंद नगर, ठाणे दरम्यान १३.४० किमी लांबीचा पूर्व मुक्त मार्ग विस्तार

**सुनियोजित शहराची उभारणी, आरामदायी जीवनमानाची हमी!**

- नैना नगर रचना परियोजनेंतर्गत विविध पायाभूत सुविधा कामांचे भूमिपूजन
- जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा मिळाल्याने शहरांचा सुसज्ज विकास
- प्रथम टप्प्या अंतर्गत ४२ चौ. कि.मी. क्षेत्राचा विकास
- ९ उड्डाणपूल, १२ लहान पूल, २६ पादचारी भुयारी मार्ग, १ वाहन भुयारी मार्ग आणि एकूण १७.५९ कि.मी. लांबीच्या रस्त्याचा समावेश

**सक्षम महिला... विचार पहिला**

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सत्कार
- महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मिळाली गती
- लाभार्थी महिलांना लाभाचे प्रातिनिधिक वितरण
- आत्तापर्यंत १.९६ कोटी भगिनींना लाभाचे वितरण

**प्रशस्त इमारत करेल नागरिकांचे स्वागत**

- ठाणे महानगरपालिकेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन
- एकाच इमारतीत सर्व कार्यालय नागरिकांना सुविधा मिळणार
- किल्ल्याच्या स्वरूपात इमारतीची रचना
- आधुनिक कार्यक्षमतेची ३२ मजल्याची प्रशासकीय इमारत व महासभेची ५ मजली इमारत.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०२४
पान : २
www.diwanews.com

# विधानसभेसाठी मराठा समाजाचा मराठा पॅटर्न

## महिनाभर मराठा जोडो अभियान

### मराठा क्रांती मोर्चाच्या नेतृत्वाखाली सकल मराठा समाज एकवटला

**ठाणे :** मराठा समाजाबाबत सर्वच राजकिय पक्षांची उदासिनता पाहता आगामी काळात मराठा एकजुटीची ताकद दाखवुन देण्यासाठी येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चाने ''मराठा पॅटर्न'' राबवण्याचा यल्गार केला आहे. या अनुषंगाने आगामी एक महिना ''मराठा जोडो अभियान'' ठाण्यातील चारही विधानसभा क्षेत्रात राबवणार असल्याची माहिती ठाणे मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक ॲड. संतोष सुर्यराव आणि प्रविण पिसाळ यांनी रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मराठा आरक्षणाचा तिढा अद्याप सुटला नसल्याने मराठा समाज आक्रमक होत आहे. ठाण्यातही सकल मराठा समाजाच्या बैठकींचा रतीब सुरू झाला असुन आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी मराठा क्रांती मोर्चाने ठाणे शासकिय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन भूमिका आपली स्पष्ट केली. या पत्रकार परिषदेला संतोष सूर्यराव, प्रविण कदम, दत्ता चव्हाण, दिनेश पवार, रमेश चौधरी, संतोष पालांडे, सुभाष एरंडे, समीर जाधव आदीसह मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत पुढे बोलताना, समन्वयक प्रविण पिसाळ यांनी, यापूर्वी राणे समितीच्या अहवालावरून दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकले नाही, नंतर युती सरकारने दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकले पण, सर्वो च्च न्यायालयात टिकले नाही.तेव्हा, आम्हाला केवळ गृहित धरले जाते, असे असंविधानिक आरक्षण देण्याऐवजी ५० टक्यांच्या आतच आरक्षण द्यावे. यासंदर्भात सरकारने नेमलेल्या गायकवाड आयोग तसेच शिंदे समितीनेही अनुकुल अहवाल दिला असे असतानाही ४० वर्ष झाली तरी मागण्या मान्य होत नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. तेव्हा, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चा आपल्या मागण्यासाठी कोणत्याही राजकिय पक्षाशी बांधिलकी न ठेवता मराठा पॅटर्न राबवणार आहे. तसेच आगामी एक महिना ठाण्याच्या चौकाचौकात ''मराठा जोडो अभियान'' राबवुन मराठा समाजाला जागरूक करणार आहे. ठाण्यातील कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघासह चारही विधानसभा क्षेत्रात मराठा समाजाची मताची मोठी ताकद असल्याने जर सर्व राजकीय पक्षांनी समाजाला गृहीत धरले तर मराठा उमेदवार देणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. ठाणे विधानसभेत १ लाख ३५ हजार मराठा मतदार तर ओवळा - माजीवडयात ५ लाख मतदारांपैकी १ लाख ५० मराठा, कोपरी- पाचपाखाडीत ८० हजार आणि कळवा - मुंब्रा मतदारसंघात ३५ हजार मराठा मतदार आहेत. याकडेही मराठा समन्वयकांनी लक्ष वेधले.

**या आहेत मराठा समाजाच्या मागण्या :-**

- कोपर्डी अत्याचारातील आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी.
- ५० टक्याच्या आत संविधानिक टिकणारे आरक्षण हवे.
- जातनिहाय जनगणना झाली पाहिजे.
- ओबीसीसह सर्व जातींचे आरक्षणाचे फेरसर्वेक्षण व्हायला हवे.
- सारथी उपकेंद्र ठाण्यात उभारून त्याची व्याप्ती वाढवावी.
- ठाण्यात मराठा हॉस्टेल व मराठा भवन व्हायला हवेत.
- सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी नेमकी कशामुळे अडली हे स्पष्ट करावे.
- मराठा आंदोलकांवरील सर्व गंभीर गुन्हे मागे घ्यावेत.

### माजिवाडा येथे कंटेनरची दुभाजकाला धडक




**ठाणे :** नाशिककडून मुंबईला निघालेल्या कंटेनर चालकाचा कंटेनरवरील ताबा सुटला आणि तो कंटेनर थेट दुभाजकाला जाऊन धडकला. हा अपघात मंगळवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास ठाण्यातील माजिवाडा नाका येथे झाला असून सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत किंवा कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तसेच या अपघाताने वाहतुक कोंडी झाली नव्हती. पण, तब्बल तासभर धीम्या गतीने वाहतूक सुरू होती. कंटेनर रस्त्याच्या एका बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरळीत सुरू झाली अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

### विकास इंगळे कल्याण ग्रामीण मधून विधानसभा लढवणार?

**दिवा :-** सामाजिक कार्यकर्ते विकास इंगळे कल्याण ग्रामीण मधून विधानसभा निवडणूक लढण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. तशी चाचणी त्यांनी सुरू केली असून यासंदर्भात कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेणार असे विकास इंगळे यांनी सांगितले.

विकास इंगळे हे मागील पंधरा वर्षापासून दिवा कल्याण ग्रामीण मध्ये सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून विशेषत: आंबेडकरी चळवळीत काम करत आहेत. कल्याण ग्रामीण मध्ये सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व असावे व परिवर्तन घडावे या हेतूने निवडणूक लढण्याची तयारी विकास इंगळे करत करत असल्याची माहिती त्यांच्या कार्यकर्त्यातून सांगण्यात येते.

### वेश्याव्यवसायातून थायलंडमधील १५ महिलांची सुटका

**ठाणे :** वेश्याव्यवसायासाठी थायलंड देशातून आणलेल्या १५ महिलांची ठाणे शहर पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने उल्हासनगरच्या एका लॉजमधून सुटका केली. त्या लॉज मॅनेजरसह चार कामगारांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून पाच लाख २७ हजार रूपयांची रोकड व साधने जप्त केल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी एका पत्रकार परिषदेत दिली.

ठाणे शहर परिसरात थायलंड देशातील महिलांना वेश्यागमनासाठी तयार करून चांगल्या आर्थिक प्राप्तीचे अमिष दाखवुन परदेशातुन बोलावुन घेवुन त्यांच्याकडून उल्हासनगर ३ येथील सितारा लॉजींग ॲंड बोर्डींग येथे वेश्याव्यवसाय करवून घेत असल्याची बातमी खंडणी विरोधी पथकास मिळाली होती. त्याच्या आधारे बनावट ग्राहक पाठवून छापा टाकत, त्या लॉजचा मॅनेजर कुलदिप उर्फ पंकज जयराज सिंग (३७) याच्यासह ०४ कामगारांना ताब्यात घेतले. तसेच तेथून १५ थायलंडमधील महिलांची सुटका केली. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता १४३ (१), १४३(३) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# शिवसेना ठाकरे गटाच्या इशाऱ्यानंतर पालिका प्रशासनाला जाग

## दिव्यातील कचरा उचलण्यास सुरुवात




**दिवा :– दिवा शहरातील इमारती व रस्त्याच्या कडेला टाकण्यात येणारा कचरा पालिकेच्या स्वच्छता विभागामार्फत उचलण्यात येत नव्हता.परिणामी नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असल्याचे सांगत दिव्यातील कचरा २४ तासात उचला अन्यथा पालिकेसमोर कचरा टाकू असा इशारा दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी पालिका प्रशासनाला दिला होता, त्यानंतर खडबडून जागे झालेल्या पालिका प्रशासनाने दिवा शहरातील कचरा उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरातील नागरिकांनी याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आभार मानले आहेत.**

> *नवरात्रीचा सण जवळ आला तरीही पालिका प्रशासन दिव्यातील कचरा समस्येवर तोडगा काढत नव्हते. परिणामी दिवा शहरातील कचरा २४ तासात उचलला नाही तर पालिका मुख्यालयासमोर कचरा टाकला जाईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आम्ही दिला होता. आता पालिका प्रशासनाने कचरा उचलण्यात सुरुवात केली आहे.*
>
> ***– ज्योती राजकांत पाटील***
> *महिला शहर संघटिका, दिवा*

दिवा शहरातील दिवा आगासन, दिवा शील रोड या मुख्य रस्त्याच्या कडेला कचरा टाकून दिलेला असतो. त्याचबरोबर शहरात विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्याच्या घटना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उघडकीस आणल्या होत्या दिव्यात कचऱ्याच्या गाड्याच फिरत नसल्याने नागरिकांना कचरा समस्या भेडसावत होती.अनेक ठिकाणी छोटे डंपिंग ग्राउंड तयार झाले होते.याकडे पालिकेच्या घनकचरा विभागाचे संपूर्णतः दुर्लक्ष झाले असून रस्त्याच्या कडेला कचरा साठवून राहिल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य पसरले होते.




रस्त्यावर टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे येथे नागरिकांना चालायला ही जागा उपलब्ध राहत नाही. याची प्रशासनाने वेळीच दखल घेऊन हा कचरा उचलण्यात यावा,अन्यथा नागरिकांच्या सहकार्याने हा कचरा उचलून पालिकेच्या कार्यालय टाकला जाईल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने ज्योती पाटील यांनी दिला होता. शिवसेनेच्या इशारा नंतर पालिका प्रशासनाला जाग आली असून पालिकेने दिवा शहरातील कचरा उचलण्यास सुरुवात केली आहे नागरिकांनी याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आभार मानले आहेत.

## परदेशात दिवाळी फराळ पाठवण्यासाठी ठाणे डाक विभागाची विशेष सुविधा

**ठाणे :** भारतीय संस्कृतीमध्ये दिवाळी या सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे फराळ. लाडू, चिवडा, चकल्या, करंज्या आणि बरंच काही..! ठाणे विभागातील बरेचसे उच्चशिक्षित तरुण-तरुणी जगातील विविध देशात कार्यरत आहेत त्यामुळे त्यांच्यापर्यंत दिवाळीचा फराळ कसा पाठवायचा हा मोठा प्रश्न त्यांच्या पालकांसमोर असतो. यांचे उत्तर ठाणे डाक विभागाने शोधून काढले आहे.

डाक विभागाच्या ठाणे विभागाने यासाठी एक महत्त्वपूर्ण सुविधा संपूर्ण ठाणे डाक विभागात उपलब्ध करून दिली आहे. या सुविधे अंतर्गत पोस्ट ऑफीसच्या माध्यमातून जगभरात दिवाळी फराळ पाठवण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. डाक विभागाच्या स्पीड पोस्ट, रजिस्टर पोस्ट, आयटीपीएस या विविध आंतरराष्ट्रीय मेल सेवा उपलब्ध असून या सेवांचे दर खाजगी कुरिअर कंपन्यांच्या दरापेक्षा बरेच कमी आहेत. ठाणे डाक विभागाच्या या सुविधेमुळे आता पालक वर्ग आपल्या विदेशातील आप्तजनांना घरगुती फराळ पाठवू शकणार आहे. या सुविधेचा लाभ ठाणे डाक विभागातील सर्व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन समीर महाजन, वरिष्ठ अधीक्षक, ठाणे डाक विभाग यांनी केले आहे.

## अर्धवट दिवा पूर्व-पश्चिम ब्रिजमुळे नागरिकांचे हाल – राजकांत पाटील

**दिवा :–** दिवा पूर्व-पश्चिम ब्रिजचे काम रखडल्याने नागरिकांना नाहक त्रास होत असून याबाबत पालिका प्रशासन व शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशी मागणी दिवा संघर्ष समितीचे अध्यक्ष राजकारण पाटील यांनी केली आहे.

मागील पाच वर्षात दिवा पूर्व पश्चिम हा रेल्वे ओव्हर ब्रिज होणे अपेक्षित असताना अद्याप या ब्रिजचे काम पूर्ण न झाल्याने दिवा शहरातील नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.दिवा गावात जाणाऱ्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा सर्वाधिक त्रास या ब्रिजचे काम न झाल्याने होतो. पालिका प्रशासन व शासनाने खरं तर यावर तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित असताना दिवा शहरातील नागरिकांना गृहीत धरण्याचे काम पालिका प्रशासन करत असल्याचे राजकांत पाटील यांनी म्हटले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०२४

www.diwanews.com

# शिवसेना ठाकरे गटाच्या ज्योती पाटील यांच्या वतीने नवरात्रीत महिलांचा विशेष सन्मान



**दिवा :–** शिवसेना ठाकरे गट व तन्वी फाउंडेशन यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पाककला स्पर्धा व होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन दिवा शहर महिला संघटिका ज्योती राजकांत पाटील यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. नवरात्र उत्सवात दरवर्षी ज्योती पाटील या विविध कार्यक्रमांचे आयोजन महिलांसाठी करत असतात. नऊ दिवस विविध कार्यक्रम तन्वी फाउंडेशनच्या माध्यमातून राबवले जातात. या कार्यक्रमानिमित्त नऊ दिवसाचे नऊ रंगाच्या साड्या देऊन महिलांचा सन्मान केला जाणार असून पाककलेतील नऊ महिला विजेत्यांना फ्रिज,डिनर सेट, आणि विविध बक्षिसे असा सन्मान केला जाणार आहे. दुसरे बक्षीस दहा हजार व पैठणी, तिसरं बक्षीस ५००० व पैठणी दिले जाणार असून पुढील स्पर्धकांना पैठणी बक्षीस दिली जाणार आहे.

















दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०२४
पान : ५
www.diwanews.com

# नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाची 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत विशेष धुरीकरण मोहीम

**नवी मुंबई : 'स्वच्छता ही सेवा'मोहीमेमध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत नमुंमपा आरोग्य विभागामार्फत विशेष धुरीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.**





नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्याकरिता नियमित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जातो. यादृष्टीने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पूर्ण कार्यक्षेत्राचा विचार करुन साप्ताहिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे, जेणेकरुन प्रत्येक कार्यक्षेत्रात आठवड्यातून एकदा फवारणी व धुरीकरण करण्यात येईल.

नमुंमपा कार्यक्षेत्रात डास प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्याकरिता ५ ते ११ ऑक्टोबर २०२४ या एक आठवड्याच्या कालावधीत विशेष धुरीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहीमेमध्ये प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात एकाच दिवशी रासायनिक धुरीकरण करण्यात येणार आहे.

याकरिता ५ ते ११ ऑक्टोबर या कालावधीत एकूण सहा गट तयार करण्यात आले असून प्रत्येक गटामध्ये ४ ते ५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समावेश आहे. यामध्ये ५ ऑक्टोबर रोजी सीबीडी, वाशीगाव, इंदिरानगर, राबाडा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात, दि. ७ ऑक्टोबर रोजी से-४८ नेरूळ, कुकशेत, सानपाडा, खैरणे, दिघा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात तसेच ८ ऑक्टोबर रोजी करावे, नेरुळ-२, तुर्भे, महापे, ऐरोली नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात रासायनिक धुरीकरण करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे ९ ऑक्टोबर रोजी शिरवणे, जुहुगाव, कातकरीपाडा, चिंचपाडा तसेच १० ऑक्टोबर रोजी नेरुळ-१, पावणे, घणसोली, इलठणपाडा आणि ११ ऑक्टोबर रोजी नोसीलनाका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात रासायनिक धुरीकरण केले जाईल. तरी नागरिकांनी सदर मोहिम यशस्वी करण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या नमुंमपा आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे व धुरीकरणाविषयी काही तक्रारी असल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास संपर्क साधावा असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचेमार्फत करण्यात येत आहे.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा, ठाण्यात शिवसैनिकांचा जल्लोष



**ठाणे :** अमृतातेही पैजे जिंका असे ज्ञानेश्वर माऊलंनी जिचे वर्णन केले आहे त्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र शासनाने दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करत शुक्रवारी शिवसेनेने आनंद आश्रम येथे खासदार नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली पेढे वाटून जल्लोष केला.

मराठी या अद्वितीय भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांनी तमाम महाराष्ट्रातील जनतेचे अभिनंदन केले. यावेळी शिवसेना ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख मिनाक्षी शिंदे, शिवसेना कोपरी पाचपाखाडी शहरप्रमुख राम रेपाळे, शिवसेना ठाणे शहरप्रमुख हेमंत पवार, ओवळा माजीवाडा शहरप्रमुख राजू फाटक, शिवसेना दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी, माजी जेष्ठ नगरसेवक संजय भोईर, विकास रेपाळे, एकनाथ भोईर, शिवसैनिक, महिला आघाडी, युवा सेना, युवती सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून गेली अनेक वर्षे प्रयत्न सुरु होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठपुरावा सुरु केला होता. निती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून आग्रह धरला होता. घटस्थापनेच्या मुहूर्तावर केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने मराठी भाषेच्या संवर्धनाबरोबर जागतिक पातळीवर मराठी भाषा पोहोचण्यास मदत होणार आहे, अशी प्रतिक्रिया खासदार नरेश म्हस्के यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री तोमर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने खासदार यांनी आभार मानले आहेत

# केशव हाईट सोसायटी सदस्यांद्वारे स्वच्छता अभियान संपन्न

**कळवा :-** केशव हाईट सोसायटी (१/२) मधील सदस्यांद्वारे २ ऑक्टोबर २०२४ रोजी उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियान राबाविण्यात आले.

महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने केशव हाईट सोसायटी(१/२) ,पारसिक नगर, ठाणे येथील कार्यकारिणी सदस्य आणि सोसायटीतील उत्साही सदस्य उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झाले. या मोहिमेमधे सर्वांनी घरोघरी जाऊन इमारतीमधील प्रत्येक मजल्यावर निरीक्षण करून अडगळ/वापरात नसलेल्या गोष्टीं, कचरा काढला आणि इमारतीच्या आजुबाजुचा सर्व परीसर स्वच्छ केला. त्याचप्रमाणे सर्व सदस्यांनी जेष्ठ नागरिक बसण्याची जागा व लहान मुलांची खेळण्याची जागा स्वच्छ केली. प्रत्येकाचा सहभाग वाढवून वरचेवर स्वच्छतेचे काम करणे आवश्यक आहे. असे सोसायटीचे अध्यक्ष विजय भोईर आणि सचिव ज्योती सावंत यांनी सांगितले. तसेच वापरात नसलेल्या गोष्टीं व्हरांड्यात/जिन्यात ठेवू नयेत, त्वरित त्याची विल्हेवाट लावावी, कारण आपले दार आपल्या घराचा आरसा असतो. घराच्या आजूबाजूचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवणे हे महत्त्वाचे कार्य आहे, असे सोसायटी मधील कार्यकारिणी समिती व सर्व ज्येष्ठ नागरिक यांनी सांगितले.




दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०२४

www.diwanews.com

## दिव्यातील सार्वजनिक नवरात्रोत्सव


श्री. एकविरा आई मित्र मंडळ. मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)


नवदुर्गा मित्र मंडळ. मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा पूर्व


नवदुर्गा नवरात्रोत्सव मित्र मंडळ. तिसाई मित्र मंडळ.
शिवसेना शाखा बाजूला,तिसाई नगर, दिवा दातिवली रोड, दिवा पूर्व


नवरूप मित्र मंडळ. प्रशांत नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)



A, B, C, D, हरिश्चंद्र अपार्टमेंट मुंब्रादेवी कॉलनी रोड दिवा


दुर्गेश्वरी सार्वजनिक नवरात्रो उत्सव २०२४ संदीप नगर दिवा पूर्व

## दिव्यातील सार्वजनिक नवरात्रोत्सव


राजे प्रतिष्ठान, यशोदा बाळाराम पाटील नगर, साबेगाव, दिवा (पूर्व)


शिवलिला सार्वजनिक उत्सव मंडळ.शिवलिला अपार्टमेंट मुंब्रादेवी कॉलनी दिवा (पूर्व)


ॐ श्री साईलिला मित्र मंडळ. गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)


दिवा विकास प्रतिष्ठान, श्री दत्तकृपा मित्र मंडळ. रिलायन्स टॉवर. मुंब्रादेवी कॉलनी रोड दिवा (पूर्व)


श्री शिवसाई मित्र मंडळ. म्हात्रे गेटची आई माऊली
दिवा आगासन रोड, दिवा (पूर्व).


काळुबाई मित्र मंडळ. काळुबाई अपार्टमेंट
बिल्डिंग नंबर ८, म्हात्रे गेट दिवा पूर्व


ABCD शिवम अपार्टमेंट मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा पूर्व

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ७ ऑक्टोबर २०२४
पान : ८
www.diwanews.com

# दिव्यातील सार्वजनिक नवरात्रोत्सव






जय अंबे मित्र मंडळ. रोनक अपार्टमेंट सेंटमेरी स्कूल
मुंब्रादेवी कॉलनी रोड दिवा पूर्व



जिवदानी मित्र मंडळ.  श्लोक नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा



आदर्श मित्र मंडळ. दिव्याची आई माऊली नवरात्र उत्सव २०२४
ओम साई अपार्टमेंट मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व)



मुंब्रादेवी आई एकविरा मित्र मंडळ. विष्णूदादा अपार्टमेंट १, मुंब्रादेवी कॉलनी रोड, ट्रान्सफॉर्मरजवळ, दिवा (पूर्व)



श्री शिव समर्थ व्यासपिठ फाउंडेशन, साबेगाव